पुणे पोलीस

# जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर

P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in


## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.२०/०९/२०१९

## दि.१९/०९/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे ३६२/१९,भादविक २७९,३०४(अ),४२७,मोव्हेॲक्ट १३४/१८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | सुधाकर निकम, पोलीस नाईक, विमानतळ पोलीस ठाणे पुणे शहर |
| **आरोपी** | अज्ञात डंपर चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/०९/२०१९ रोजी पहाटे ०५/३० वा. एअर फोर्स,लोहगावकडे जाणा-या रोडवर, लोहगाव,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील डंपर हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी लक्ष्मण धर्मा राठोड,वय-३८ वर्षे,रा.न्याती बिल्डिग समोर लेबर कॅम्प,वडगाव-शेरी,पुणे हा एअर फोर्स रोडवर रस्त्याचे कडेला उभा असताना,त्यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एच.एस.गिरी ९४०३६२०२६७ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे ३५७/१९,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३४,रा.पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईलधारक, फेसबुक व बँकेचा खातेधारक व्यक्ती (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/०३/२०१९ ते दि.१४/०५/२०१९ रोजीचे कालावधीत फिर्यादी यांचे राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात मोबाईलधारक, फेसबुक व बँकेचा खातेधारक व्यक्तीने फिर्यादी यांना फेसबुकवर फेण्ड रिक्वेस्ट पाठवुन त्यांचा व्हाटसॲप नंबर प्राप्त करून,त्याचेवर वेळोवेळी मेसेज करून त्यांना लग्नाचे अमिष दाखवुन,फिर्यादी यांना परदेशातुन डायमंड ज्वेलरी, बॅग, कपडे असे गिफ्ट पाठविल्याचे सांगुन,त्यांनी पाठविलेले गिफ्ट हे दिल्ली येथे आले असुन,सदर पार्सलची डिलेव्हरी देण्याकरीता कस्टम डयुटी भरावी लागेल असे सांगुन, फिर्यादी यांना वेग-वेगळया बँकेमध्ये विविध व्यक्तींच्या खात्यावर ४,०९,०००/- रूपये भरण्यास सांगुन,फिर्यादी यांची अर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) उत्तम चक्रे ९५९४९०२०८५ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सायबर पो स्टे १७/१९,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-५५,रा.कात्रज,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईलधारक व एटीएम / डेबीट कार्डचा वापरकर्ता (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/०६/२०१९ ते दि.१८/०६/२०१९ रोजीचे कालावधीत विश्वेश्वरी सहकारी बँक लिमी.पुणे चिंचवड ब्रँच,बाणेर रोड,पिंपळे-सौदागर ब्रँच या एटीएम सेंटर मधुन |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे विश्वेश्वरी सहकारी बँक लिमी.पुणे येथे ब्रँच मॅनेजर या पदावर नेमणुकीस असुन,कोणीतरी अज्ञात मोबाईलधारक व एटीएम / डेबीट कार्डचा वापरकर्ता व्यक्तीने एका बँकेतील एटीएम कार्डचा वापर करुन, विश्वेश्वरी सहकारी बँक लिमी.पुणे येथील एटीएम सेंटर मधुन एकुण १०,०००/- रूपयेचे १४ वेळा बेकायदेशीरपणे ट्रान्झेक्शन करुन,एकुण १,४०,०००/- रुपये रकमेची बँकेची फसवणुक केली आहे |
| **त.अंमलदार** | पो.निरी. राजकुमार वाघचवरे ९८२३९९३२९९ |

## दि.२०/०९/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्ह

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ८०७/१९,भादविक ३०७,३२३,५०६(२),१४३,१४४,१४६,१४७,१४८,१४९,३४ |
| **फिर्यादी** | दत्ता समिंदर,वय-३० वर्षे,रा.आंबेडकर वसाहत,डी.पी.रोड औंध,पुणे |
| **आरोपी** | एकुण सहा इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२०/०९/२०१९ रोजी रात्रौ ००/४५ ते ०१/०० वा. चे दरम्यान कुंदन मेडीकल जवळ,औंध, पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व नमुद इसम हे एकाच वस्तीतील राहणारे असुन, दीड महिन्या पुर्वी दारु पिऊन रिक्षा स्टँडवर थांबु नकोस असे म्हणल्याचे कारणावरुन त्यांचेमध्ये हाणामारी झाली होती. त्याचा मनात राग धरुन,त्यांनी संगनमत करुन,कट रचुन,फिर्यादी हे रिक्षा चालवत असताना,सदर इसमांनी फिर्यादी यांची रिक्षा आडवुन,त्यांना पकडुन लाथा-बुक्यांनी मारहाण करुन,त्यांचे जवळील कोयत्याने शरिरावर वार करुन,त्यांना गंभीर जखमी करून,जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. राजेश माळेगावे ९८२२४१४९०२ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**